भारती हॉस्पिटलचा सामाजिक उपक्रम

आरोग्य भारती

डेंगूच्या वाढत्या साथीमुळे समाजात जागरुकता निर्माण करण्यासाठी हा विशेषांक पुनर्प्रकाशित करत आहोत.

डेंग्यू आजार विशेषांक (पुनर्प्रकाशन)

ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१७ अंक- सतरा

हितगुज

डेंग्यू-चिकुनगुन्या यांचे वाढलेले प्रमाण पाहता आपण अजूनही आवश्यक तेवढी सार्वजनिक स्वच्छतेची काळजी घेतो की नाही याचा विचार करण्याची वेळ आली आहे. एकीकडे जागतिक महासत्ता म्हणून आपली सुरू असलेली दमदार वाटचाल आणि दुसरी बाजू पाहिली तर डासामुळे पसरणाऱ्या साथीने आपण हैरान.

शिक्षणाचे प्रमाण वाढले पण खरोखरीच सुशिक्षितता आली की नाही, याच्या मुळाशी जाणे यानिमित्ताने गरजेचे झाले आहे. प्रत्येक वर्षी पावसाळा सुरू होण्याआधी सरकारी पातळीवर साथीचे आजार पसरु नयेत यासाठी जनजागृती मोहिम हाती घेतली जाते. प्रत्येक वर्षी जनजागृती करूनही लोकांकडून निष्काळजीपणा बाळगला जातो. त्याचे परिणाम संबंध समाजाला भोगावे लागतात.

सरकार व समाज जेंव्हा हातात हात घालून चालतात तेंव्हाच खऱ्या अर्थाने कोणत्याही मोहिमेचे यश दिसून येते. जागरूकता वाढली आहे पण ठराविक लोकच यासाठी प्रयत्न करताना दिसून येतात. आपण त्या गावचे नाहीच असा काहींनी समज करून घेतलेला असतो तर स्वच्छता हे काम सरकारचे आहे माझे नाही असा काहींचा ग्रह असतो.

माझ्या घरात मी स्वच्छता पाळेन सार्वजनिक स्वच्छतेचे मला काही देणे-घेणे नाही. त्यामुळे घरातील कचरा फक्त बाहेर टाकण्याकडे कल दिसून येतो. प्रत्येकजण जर फक्त स्वत:पुरता विचार करू लागला तर आपल्या येणाऱ्या पिढ्यांना आपण काय आदर्श ठेवणार. आपल्याही दारावर साथीचा आजार कधी दस्तक देईल याचा काही नेम नाही हे विसरल्यामुळे सार्वजनिक स्वच्छतेबाबत एवढा निष्काळजीपणा दिसून येतो. खऱ्या अर्थाने कुठलाही साथीचारोग हा भुषणावह निश्चितच नाही. कित्येक दिवसांच्या अनेकांनी केलेल्या मेहनतीवर पाणी फिरल्यासारखे आहे. पण आपले दुर्दैव हे आहे की जोपर्यंत आपल्यावर येत नाही तोपर्यंत आपण जागे होत नाही.

सखोल विचार केला तर एकाच वेळी अनेकजण आजारी असणे यामुळे एकंदरीत समाजावरील व अर्थव्यवस्थेवरील ताण वाढतो, त्यामुळे प्रगतीकडे आपण उचललेले पाऊल अधिकच जड होते. चला आपण सगळे मिळून वैयक्तिक स्वच्छतेबरोबरच सार्वजनिक स्वच्छता बाळगण्याचा पण करुयात.

डॉ.अस्मिता कदम/जगताप
कार्यकारी संचालिका,
भारती हॉस्पिटल, पुणे.

विचार दर्शन

"We can no more gain God's blessing with an unclean body than with an unclean mind. A clean body cannot reside in an unclean city."

Mahatma Gandhi

डंख छोटा धोका मोठा

डेंग्यू ताप

डेंग्यू ताप हा एडिस डासामुळे पसरणारा विषाणूजन्य आजार आहे. डासामुळे पसरणाऱ्या आजारामध्ये डेंग्यू ताप व डेंग्यू रक्तस्त्रावी ताप हे मुख्य आजार आहेत.वस्तुत: डेंग्यू हा सर्वसामान्य आजार आहे परंतु काही वेळा तो जीवघेणा ठरू शकतो. डेंग्यूच्या विषाणूच्या चार प्रजाती आहेत.एका प्रजातीपासून रोग झाला तरीही परत इतर प्रजातीपासून परत डेंग्यू होऊ शकतो.

आजाराची लक्षणे

ताप,अंगावर पुरळ,पाठदुखी,डोकेदुखी,डोळयाच्या खोबणीमध्ये दुखणे,स्नायुत वेदना,सांधेदुखी

डेंग्यू डासाची वैशिष्ट्ये

१.या डासाच्या पायावर पांढरे पट्टे असतात म्हणून त्याला टायगर मॉस्क्युटो म्हणतात.

२.हा डास दिवसा चावतो म्हणून कार्यालय,शाळा,कॉलेज कोठेही चावू शकतो.

३.हा डास लोंबकळणाऱ्या वस्तू उदा.दोरी, लाईटची वायर, छत्री, काळे कपडे इतर ठिकाणी विश्रांती घेतो.

४.या डासाची अंडी वर्षभर पाण्याशिवाय राहू शकतात आणि वर्षभरानंतर पाणी उपलब्ध होताच त्यामधून पुन्हा अळी तयार होते. त्यामुळे डास अळी असलेली भांडी घासून,पुसून स्वच्छ ठेवावीत जेणेकरून त्यांची पृष्ठभागाला चिकटलेली अंडी नष्ट होतील.

५.डासाची मादी हि १०० मीटर पर्यंत उडू शकते त्यामुळे आजू-बाजूचा परिसर स्वच्छ ठेवणे गरजेचे आहे.

६.या डासाला अंडी घालण्यासाठी अगदी थोड्या पाण्याची गरज असते, म्हणजे अगदी चार-पाच चमचे देखील पाणी पुरते.

७.डासाचे जीवनचक्र - डासांची अंडी (१ ते २ दिवस)- डासांच्या अळया (५ ते ७ दिवस)- डासांचे कोष (१ ते २ दिवस)- पूर्ण वाढ झालेला डास. पूर्ण वाढलेल्या डासाचा जीवनकाल साधारणत: दोन ते तीन आठवडे असतो.

चिकुनगुन्या हा विषाणूजन्य आजारही एडिस डासामुळेच पसरतो.

एडिस डासाची उत्पत्तीस्थाने

डेझर्ट कुलर, पाणी साठवण्याची भांडी, भंगार पडलेले टायर्स, नारळाच्या करवंट्या, डिस्पोजेबल कप, वरुन उघड्या असलेल्या पाण्याच्या टाक्या, पाणी साठवण्याचे हौद, कन्स्ट्रक्शन साईट, ग्राईंडींग स्टोन इत्यादी.

एडिस डासामार्फत रोगप्रसार कसा होतो.

ताप येण्याच्या १ दिवस आधी व ताप आल्यानंतर ५ दिवस शरीरात विषाणू मोठ्या प्रमाणात असतात. त्यावेळी रुग्णास डास चावल्यास डासाच्या शरीरात ते विषाणू जातात - डासाच्या शरीरात विषाणूची वाढ होते व ८ ते १० दिवसांनी हा डास दुसऱ्या निरोगी व्यक्तिस चावल्यास रोग देऊ शकतो - रोगाची लक्षणे दिसण्यास सुमारे चार ते सहा दिवस लागतात.

पुढे सुरू पान नं. ३...

डेंग्यू तथ्य

★ फक्त एडिस डास मादी रक्त पिते कारण तिला अंडी घालण्यासाठी प्रथिनांची गरज असते. नर डास झाडांच्या रसावर जगतात.डासाची मादी पोट भरण्यासाठी एकावेळी अनेकांना चावते त्यामुळे रोग अधिक पसरतो.

★ मादी एडिस डास तिच्या जीवनचक्रात १४ ते २१ दिवसात साधारणत: ३०० अंडी घालते. विषाणूदुषित डास विषाणूदुषित अंडी घालतात व त्यापासून होणारे डास विषाणूग्रस्त असतात.

★ डास अंगाचा वास,श्वासातील कार्बनडायऑक्साईड आणि शरीराची ऊब यामुळे आकर्षित होतात.

नविन आलेला झिका विषाणूही एडिस डासामुळेच पसरतो.

"चलातर सगळे मिळून या पांढऱ्या पायाच्या डासाला घालवूया"

एडीस डासाची उत्पत्ती कशी रोखावी

१. एडीस डासाची उत्पत्तीस्थाने नष्ट करणे
२. घराभोवती/परिसरात ज्यामध्ये पाणी साचू शकेल अशा निरूपयोगी वस्तू साचू देऊ नयेत. त्या नष्ट कराव्यात
३. पंक्चर दुकानातील टायर्स त्यात पाणी साठणार नाही अशा प्रकारे रचवावेत.
४. कीटकनाशक अबेटचा वापर करावा
५. गप्पी मासे अळीनाषक मासे असल्याने साठलेल्या पाण्यात हे मासे सोडल्यास मोठा प्रतिबंध होतो.
६. डास अळी आढळलेले पाणी गटारात न ओतता जमिनीवर ओतावे
७. पाणी साठा मोकळा करणे शक्य नसल्यास त्यात अळीनाशक औषध वापरावे.
८. पाण्याचे दुर्भिक्ष असल्यास असे पाणी गाळून वापरावे. तत्पूर्वी पाण्याचे भांडे घासून स्वच्छ कापडाने पुसून घ्यावे.

वैयक्तिक पातळीवर करावयाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना

१. ड्रम तळापासून स्वच्छ धुऊन झाकण लावावे
२. कुंडी-मनीप्लांट मधील पाणी बदलावे
३. भंगार साहित्य टेरेस-छप्परवर ठेऊ नये
४. निरोपयोगी वस्तूंची विल्हेवाट लावावी
५. खिडकीला हौदाला जाळी बसवावी
६. झोपताना मच्छरदाणीचा वापर करावा
७. टाक्यांना झाकण बसवावे
८. फ्रीजच्या ट्रेमधील पाणी काढावे
९. पूर्ण बाही असणारे कपडे वापरावेत
१०. खिडक्यांना मच्छरप्रतिबंधक जाळी बसवावी
११. गुड नाईट-ओडोमॉस इ. वापरावे (दिवसाही)

संशयित रुग्णांच्या परिसरात ॲबॅटिंग औषधफवारणी, धुरफवारणी करण्यात येते.

घरातील दहा मिनिटांची स्वच्छता मोहिम

१. फ्लॉवरपॉट, कुंड्याखालील डिश यातील पाणी एकदिवसाआड बदला
२. ड्रेनेजच्या झाकणांच्या खळग्यामध्ये वाळू भरावी
३. पाणी भरण्याच्या बादल्या व ईतर भांडी पालथी घाला
४. आठवड्यातून एकदा कोरडा दिवस पाळा

डेंग्यूची धोकादायक लक्षणे

रक्त येणे-रक्तस्राव - त्वचेवर लाल डाग, नाकातून किंवा दाढेतून रक्त येणे, उलटीत रक्त पडणे, शौचाचा रंग काळा असणे, योनिमार्गातून प्रचंड रक्त जाणे. सतत उलट्या होणे पोटात तीव्र वेदना,गुंगी येणे किंवा चिडचिड होणे, निस्तेज-थंड वा आर्द्र त्वचा, श्वास घेण्यास त्रास.

डेंग्यू रुग्णाची काळजी

संपूर्ण विश्रांती भरपूर पाणी पिणे. प्लेटलेटची संख्या कमी होऊन रक्तस्राव संभवतो त्यामुळे प्लेटलेट सतत तपासत राहणे. प्लेटलेटची संख्या १०,००० पेक्षा कमी झाल्यास ताबडतोब ॲडमिट करावे. रुग्ण हाच आजाराचा स्रोत असल्यामुळे रुग्णाला डास चावणार नाहीत याची खबरदारी घ्यावी. ॲस्पिरीन/स्टेरॉईड ही औषधे घेऊ नयेत.प्रतिजैवकांची (ॲंटीबायोटिक)गरज नाही.

प्रतिबंध हाच उत्तम उपाय आहे.

कोणताही ताप अंगावर काढू नका. रक्ताची तपासणी करून घ्या. पहिल्या दिवसापासून ७ दिवसापर्यंत NS1 Antigen Test **व ५ दिवसानंतर** IgM Antibody Test **पॉझिटिव्ह येते.**

डॉ.वर्षा वैद्य,
प्रोफेसर कम्युनिटी मेडिसिन विभाग,
भारती विद्यापीठ मेडिकल कॉलेज

हसा चकटफू

एक मच्छरचे बाळ पहिल्यावेळेस उडण्यास शिकले. उडून परत आल्यावर बापाने विचारले-कसे वाटले पहिल्यांदा उडून. मुल-अतिशय चांगले मी जेथे जाईल तेथे लोक माझ्यासाठी टाळ्या वाजवत होते.

मच्छरांचे एक घर - बाप मुलाला समजावत होता. बाळा माझे ऐक डेंगुचा कोर्स करून घे, मलेरियाचा कोर्स आता जूना झाला.

News @ a glance



भारती हॉस्पिटल, पुणे महानगरपालिका व पी.डी.ए. यांच्या संयुक्त विद्यमान डेंग्यू अवेअरनेस कार्यक्रम घेण्यात आला.

जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त कर्मचाऱ्यांसाठी लेक्चरचे आयोजन करण्यात आले.

हॉस्पिटल सेफ आय संदर्भात ऑडीट झाले.

जागतिक फार्मसी डे केक कापून साजरा करण्यात आला.

भारती हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर

पुणे-सातारा रोड,धनकवडी,पुणे-४३

+91 20 40555555/40555444 admin@bharatihospital.com /bharatihospitalpune